# दीड हजार किलोमीटर 'मेट्रो-३'ची तालीम!

## डायनॅमिक आणि स्टॅटिक चाचण्या पूर्ण

मुंबई, ता. १ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गावर पहिल्या टप्प्यात आरे ते बीकेसी स्थानकांदरम्यान मेट्रो सेवा सुरू करण्याची तयारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) सुरू आहे. या मार्गावर धावणाऱ्या मेट्रो ३ च्या पहिल्या ट्रेनच्या चाचण्या सुरू असून आतापर्यंत ट्रेनने ट्रायल रनद्वारे १ हजार ५०० किमीपेक्षा जास्त डायनॅमिक आणि स्टॅटिक चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत.

मेट्रो ३ चा मार्ग प्रवाशांच्या सेवेत आणण्यासाठी मेट्रो ट्रेनच्या चाचणी एमएमआरसीएलने सुरू केल्या आहेत. मेट्रोचे आठ डबे आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून मुंबईत दाखल झाले आहेत. या डब्यांची जुळवणी करून मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३ किलोमीटर लांबीच्या ट्रॅकवर चाचण्या घेण्यास सुरुवात झाली. आरेमध्ये कारशेड बनवण्याच्या कामाला गती आली असून पहिल्या टप्प्यात आरे ते बीकेसीदरम्यान मेट्रो सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर २९ डिसेंबर २०२२ रोजी दुसरी ८ डब्यांची ट्रेन मुंबईत दाखल झाली आहे. या ट्रेनच्या सारिपुत नगर आणि सहार येथील रॅम्पदरम्यान ५ किमीच्या अंतरावर आवश्यक चाचण्या घेतल्या जाणार आहेत.